भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ४५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२९/०७/२०१६.

१) क्षुल्लक कारणावरुन शिविगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिली . :—

दिनांक २८/०७/२०१६ चे ११.०० वा. दर. फिर्यादी शाम कुवरलाल दमाहे वय ३५ वर्ष, रा. सिरसोली हे आपल्या शेतातील विहीरीचे पाणी प्लास्टीक पाईप व्दारे आरोपीच्या बांधीतुन आपल्या दुस—या बांधीमध्ये नेण्याकरीता व पाईप जाण्याकरीता मजुराचे हाताने नेत असता यातील आरोपीने नेण्यास मनाई केली. फिर्यादीने आरोपीला हटकले की बांधीतुन पाईप का नेवु देत नाही. असे बोलले असता अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. राऊत पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

२) शेतीच्या वादावरून शिविगाळ व मारहान करण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०७/२०१६ रोजी ११.०० वा. दर. फिर्यादी नंदकिशोर भाऊलाल दमाहे वय ४५ वर्ष, रा. सिरसोली यांच्या बांधीतुन मजुराच्या हाताने पाण्याचे प्लास्टीक पाईप आपल्या शेतात नेत असतांना त्यास मनाई केली असता यातील आरोपीने फिर्यादीचे जवळ येवुन पाईप का नेवु देत नाही असे बोलुन तोंडा—तोंडी भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ देवुन पावडयाने मारुन टाकीन अशी धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६, भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. राऊत पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

३) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—

दिनांक २८/०७/०१६ रोजी १४.०० वा. दरम्यान आरोपीची वाहन क्र. एमएच ४०/७५०० च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत निलज चौक येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे वैद्यकीय अधिकारी ग्रा.रू. पवनी कळुन तपासनी करून वैद्यकीय अभिप्रायावरून व सर तर्फे फिर्यादि पो.शी. बान्ते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. गभणे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) प्रकृती बिघडल्याने उपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक २८/०७/०१६ रोजी ०२.३० वा. दर. यातील मृतक चंद्रशेखर भिमाराव गोवर्धन वय ५० वर्ष रा. मोहरी याने दारूचे जास्त प्रमानात सेवन करून त्याची प्रकृती जास्त खराब झाल्याने त्यास उपचारा करीता ग्रा. रू. पवनी येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरन पावला. असे फिर्यादी बाळकृष्ण रामचंद्रजी फुलबांधे वय ४५ वर्ष, रा. निलज यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. गोंडाने पो.स्टे. पवनी करीत आहेत.

५) विवाहीतेचा उपचारा दरम्यान मृत्यु. :—

दिनांक ०५/०७/०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील मृतक सौ. रविकांता नरेश बडवाईक वय ५० वर्ष रा. मोरगाव/राजेगाव हिचे पोटात दुखत असल्याने तीला उपचारा करीता प्रथम दि. ०५/०७/२०१६ ला डॉ. रंगारी यांचे कडे उपचार करून पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नाागपुर येथे भरती केले असता उपचारादम्यान मरन पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर शहर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र टपालाव्दारे दि. २८/०७/२०१६ रोजी प्राप्त झाला. असे सर तर्फे फिर्यादी पोहवा. हेमके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. थेर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.